MHNG120009132020

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | – २९.०८.२०२० | | | |
| नोंदणी तारीख | – २९.०८.२०२० | | | |
| निकाल तारीख | – १२.०३.२०२६ | | | |
| कालावधी | – | वर्ष | महिने | दिवस |
| | | ०५ | ०६ | १४ |

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नरखेड, जि.नागपूर यांच्या न्यायालयत

(पिठासीन अधिकारी – रोहन विजयकुमार थाईल)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३७९/२०२०** **नि.क्र.१५**

### फॉर्म – अ

| | |
|---|---|
| तक्रारदार/फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे, जलालखेडा |
| प्रतिनिधीत्व | श्री. व्ही. यु. मिरचे, विशेष सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | एजाज परवेज मतीन खाँ पठाण,<br>वय ३० वर्ष, व्यवसाय–चिकन सेंटर,<br>रा. वार्ड क्र. ३, जलालखेडा,<br>ता.नरखेड, जि.नागपूर |
| प्रतिनिधीत्व | श्री. डी. सी. सहारे, आरोपीतर्फे विधीज्ञ |

### फॉर्म – ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०९/०४/२०२० |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०९/०४/२०२० |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २९/०८/२०२० |
| प्रतिकथन नोंदविल्याचा दिनांक | १७/११/२०२५ |
| पुरावा सुरु होण्याचा दिनांक | १२/०३/२०२६ |
| ज्या दिवशी निकाल राखुन ठेवला तो दिनांक | – |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १२/०३/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | ––– |

## फॉर्म — क

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामीन दिल्याचा दिनांक | गुन्हा | निर्दोष/ दोषी | शिक्षा ठोठावली | फौ.प्र.सं. च्या कलम ४२८ च्या उददेशाने अटकेत ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एजाज परवेज मतीन खाँ पठाण | – | – | भा.द.वि. चे कलम १८८,२६९,२७० व कोव्हीड–१९ चे कलम ११, राष्ट्रीय आपत्ती कायदाचे कलम ५१ आणि द इपीडीमीक्स डीसेजेस कायदा चे कलम ३ | निर्दोष | –– | –– |

# – न्यायनिर्णय –

(दिनांक १२.०३.२०२६ रोजी घोषित)

१. आरोपिविरुध्द भारतीय दंड विधान चे कलम १८८, २६९, २७० व महाराष्ट्र कोव्हीड-१९ चे कलम ११, राष्ट्रीय आपत्ती कायदा चे कलम ५१ आणि द इपीडीमीक्स कायदाचे ३ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन त्याच्याविरुध्द सदर खटला चालविण्यात आलेला आहे.

२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे कि–

फिर्यादी हा जलालखेडा पोलीस स्टेशन येथील पोलीस शिपाई आहे. दिनांक ०९/०४/२०२० रोजी फिर्यादी हा त्याच्या खाजगी वाहनाने जलालखेडा येथे शेर ए बारात निमीत्त पेट्रोलिंग करीत होता. त्यावेळी शासनाने कोविड–१९ या रोगाचे प्रादुर्भाव रोखण्यासाठी व मा. जिल्हा दंडाधिकारी यांनी कलम १४४ सी.आर.पी.सी. नुसार संचारबंदी लागु केली होती. तेंव्हा आरोपी हा जलालखेडा येथील कब्रस्थान जवळ लपत छपत जात असतांना दिसला. तेंव्हा फिर्यादीने आरोपीस थांबवून त्याला संचारबंदी व घरात राहण्याचे निर्देश आहे असे सांगितले असता आरोपी हा उडवा उडवीचे उत्तरे देत होता. आरोपीने मा. जिल्हा दंडाधिकारी नागपुर यांचे कलम १४४ चे उल्लंघन केले. तसेच कलम १८८, २६९, २७० भा.द.वि. सहकलम नियम ११ कोविड–१९ व आपत्ती व्यवस्थापन कायदा आणि द इपीडीमीक्स डिसीजेस कायदाचा भंग केला आहे. सबब फिर्यादीने आरोपी विरुध्द पोलिस स्टेशन, जलालखेडा येथे रिपोर्ट दिली.

३. फिर्यादीच्या तक्रारीवरुन गुन्हा क्र. १२१/२०२० ची नोंद करण्यात आली. तपासादरम्यान संबंधीत तपासी अधिका–याने फिर्यादीचा पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षिदारांचे जवाब नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुध्द भक्कम पुरावा मिळून आल्याने उपरोक्त नमुद कायद्याअंतर्गत दोषारोपपत्र तयार करण्यात आले व न्यायालयात सादर करण्यात आले.

४. आरोपिची नि.क्र.०९ अन्वये विनंती नोंदवली. आरोपिने गुन्हा कबूल नसल्याचे कथन करुन खटला चालविण्याची विनंती केली. आरोपीचा बचाव पुर्णतः नकाराचा आहे. आरोपी विरुध्द सबळ पुरावा आढळून न आल्याने आरोपीचे फौर्जदारी प्रक्रिया संनितेच्या कलम ३१३ अन्वये बयान नोंदविण्यात आले नाही.

५. उभय पक्षाचा युक्तिवाद ऐकला. सदर प्रकरणाच्या अनुषंगाने खालील मुददे माझ्या विचारात उपस्थित झाले. सदर मुदयांना मी माझे निष्कर्ष त्या खाली दर्शविलेल्या कारणांसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे काय कि दिनांक ०९/०४/२०२० रोजी आरोपीने जिल्हा दंडाधिकारी, नागपुर यांचे कलम १४४ चे उल्लंघन तसेच कलम १८८, २६९, २७० भा.द.वि. सहकलम नियम ११ कोविड–१९ व आपत्ती व्यवस्थापन कायदा आणि द इपीडीमीक्स डिसीजेस कायदाचा भंग केला काय हे ? तसेच आरोपीने फिर्यादीस उडवा उडवीचे उत्तरे दिले काय ? | नाही |
| २ | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुददा क्र.१ करिता</u> –**

६. आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान चे कलम १८८, २६९, २७० व महाराष्ट्र कोव्हीड-१९ चे कलम ११, राष्ट्रीय आपत्ती कायदा चे कलम ५१ आणि द इपीडीमीक्स कायदाचे ३ नुसार गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे दोन साक्षिदारांची साक्ष नोंदविण्यात आली. निशाणी क्र. १४ वर पुरसिस दाखल करुन

सरकारी पक्षाने त्यांचा पुरावा बंद केला.

७. साक्षिदार क्र.१ राजेश पुंडलिक चौरे हा घटनास्थळ पंच आहे. त्याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, पोलीसांनी पंचनाम्यासाठी त्याला बोलाविले नव्हते. साक्षीदार क्र. १ ने त्याच्या पुराव्यामध्ये अभियोगपक्षाला कोणतेही सहकार्य केले नाही. सदर साक्षिदाराने सरकारी पक्षाला सहकार्य न केल्यामुळे विशेष सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या पूर्व परवानगीने सदर साक्षिदाराला उलट तपासणीच्या स्वरुपातील सुचक प्रश्न विचारले. परंतु सदर साक्षिदाराने सर्व सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे देउन अभियोगपक्षाला कोणतेही सहकार्य केले नाही.

८. साक्षीदार क्र. २ धनंजय मानिकराव निकोसे हा घटनास्थळ पंच आहे. त्याने त्याच्या पुराव्यामध्ये असे कथन केले की, पोलीसांनी पंचनाम्यासाठी त्याला बोलाविले नव्हते. सदर साक्षिदाराने सरकारी पक्षाला सहकार्य न केल्यामुळे विशेष सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या पूर्व परवानगीने सदर साक्षिदाराला उलट तपासणीच्या स्वरुपातील सुचक प्रश्न विचारले. परंतु सदर साक्षिदाराने सर्व सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे देउन अभियोगपक्षाला कोणतेही सहकार्य केले नाही.

९. सदर २ साक्षिदार तपासल्यानंतर विशेष सरकारी अधिवक्याने निशाणी १४ वर बंद पुरसिस दाखल केले आहे. त्यामुळे सरकारी पक्षाला इतर साक्षिदार तपासून कोणतीही फलप्राप्त होणार नाही. आरोपीवर लावलेले गुन्हे सरकारी पक्षाला निसंशयरित्या सिध्द करता आले नाही. साहजिकच त्यांचा फायदा आरोपीला देउन त्याची निर्दोष मुक्तता करणे क्रमप्राप्त ठरते. सबब मुददा क्र.१ वर मी माझा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुददा क्र.२ करिता</u>** –

१०. प्रस्तुत खटल्यातील साक्षिदाराने सरकारी पक्षाला न दिलेला पाठिंबा, त्यांच्या पुराव्यातील तफावती व विसंगती, तपासी अधिकारी व इतर साक्षिदारांचा न

नोंदविलेला पुरावा या सर्व बाबींचा सारासार विचार केल्यानंतर सबळ पुराव्याअभावी आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र ठरतो. त्या अनुषंगाने खालील आदेश पारीत करण्यात येतो –

## आदेश

१. आरोपी एजाज परवेज मतीन खॉं पठाण, रा. जलालखेडा, ता.नरखेड, जि.नागपूर याची भारतीय दंड विधान चे कलम १८८, २६९, २७० व महाराष्ट्र कोविड -१९ चे कलम ११, राष्ट्रीय आपत्ती कायदा चे कलम ५१ आणि द इपीडीमीक्स कायदाचे ३ अनर्व्ये अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे बंधनपत्र् व जामीनपत्र् रदद् करण्यात येते.

३. कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या पुर्ततेकरिता आरोपीने सदर न्यायानिर्णयाविरुध्द अपील झाल्यास, अपील न्यायालयामध्ये हजर राहण्याकरिता प्रत्येकी रु.१५,०००/– चा वैयक्तिक जात मुचलका, निकाल तारखेपासून ६ महिन्यांकरिता न्यायालयामध्ये दाखल करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उदघोषित करण्यात आला.)

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2026.03.12 23:12:14 -0400

**(रोहन विजयकुमार थाईल)**
**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,**
**नरखेड, जि.नागपूर**

**ठिकाण – नरखेड**
**दिनांक – १२.०३.२०२६**

# फॉर्म – ड

फिर्यादी/बचावपक्ष/न्यायालय/साक्षिदारांची यादी.

(अ) फिर्यादी साक्षिदारांची यादी

| अ.क्र | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १ | राजेश पुंडलिक चौरे | घटनास्थळ पंच | १० |
| २ | धनंजय मानिकराव निकोसे | घटनास्थळ पंच | १२ |

(ब) बचावपक्ष साक्षिदारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

(क) न्यायालय साक्षिदारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

फिर्यादी/बचावपक्ष/न्यायालय निशाणी क्रमांक यादी.

(अ) फिर्यादी निशाणी क्रमांक यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ११ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |
| २ | १३ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |

(ब) बचाव पक्षाने मान्य केलेल्या दस्ताऐवजांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

(क) बचावपक्ष निशाणी क्रमांक यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

(ड) न्यायालय निशाणी क्रमांक यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

(इ) मुददेमाल वस्तु क्रमांक

| अ.क्र. | मुददेमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | – | – |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2026.03.12 23:12:31 -0400

**(रोहन विजयकुमार थाईल)**
**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,**
**नरखेड, जि.नागपूर**

**ठिकाण – नरखेड**
**दिनांक – १२.०३.२०२६**

| | |
|---|---|
| बहस ऐकल्याचा दिनांक | १२/०३/२०२६ |
| निकालाचा दिनांक | १२/०३/२०२६ |
| निकाल टंकलिखीत केल्याचा दिनांक | १२/०३/२०२६ |
| निकाल सही केल्याचा दिनांक | १२/०३/२०२६ |

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते कि निकालाच्या पी.डी.एफ.फाईल मधील मजकुर हा मुळ निकालाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – व्ही. ए. चव्हाण (श्रेणी -३)